ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# संगीतातील स्वर श्रुती संकल्पना



**प्रा. डॉ. महेश शामराव दाडगे**
**संगीत विभाग प्रमुख , नवगण महाविद्यालय, परळी वैजनाथ.**

**प्रस्तावना :**

भारतीय संगीत हे स्वर आणि लयाच्या शिस्वबध्द प्रस्तूतीकरणावर आधारीत आहे. संगीतात सात स्वर असतात ही सर्वसामान्य माहिती सर्वांनाच माहिती आहे. सात स्वरांच्या या समुहास सप्तक असे म्हणतात. भारतीय संगीतातील या सप्तकातील सात स्वर निम्नलिखीत स्वरपात लिहीले व संबोधले जातात.

सा- षड्ज
रे- रिषभ
ग- गंधार
म- मध्यम
प- पंचम
ध- धैवत
नी- निषाध

या सात स्वरांना अनुक्रमे आपण सा रे ग म प ध नी असे सप्तक म्हणतो. या सात स्वरांना शुद्ध स्वर म्हणतात. ही माहिती सर्वसामान्यांसाठी समजण्याहतपत ठीक आहे. जर कोणी संगीतात १२ स्वर असतात असे कोणी म्हण्टले तर सर्वसामान्य लोक त्याला वेड्यात काढतील. संगीताच्या जाणकार किंवा संगीताबद्दल थोडीशी माहिती असणाऱ्या लोकांना ते समजेल. या सात स्वरांमध्ये काहीं विकृत स्वर सुद्धा असतात. हे विकृत स्वर एकुण ५ असतात. सात शुद्ध स्वर आणि ५ विकृत स्वर असे एकुण १२ स्वर होतात. या बारा स्वरांतूनच काणतेही राग, गाणी गायली जातात.

शुद्ध स्वर तर आपणास माहितच आहेत. तर मग या विकृत स्वरांबद्दल आपण माहिती घेऊ. हे विकृत स्वर म्हणजे रे ग म ध आणि नी यांची विकृती केलेले स्वर असतात. सा आणि प या दोन स्वरांची विकृती केलेली नसल्याने या दोन स्वरांना अचल स्वर म्हणतात. विकृत स्वर हे शुद्ध स्वरांच्या उंचीपेक्षा खाली किंवा वर असतात. शुद्ध स्वराच्या उंची पेक्षा कमी उंचीचा स्वर असेल तर त्याला आपण कोमल स्वर असे म्हणतो आणि शुद्ध स्वरापेक्षा जास्त उंचीचा स्वर असेल तर त्याला तिव्र स्वर म्हणतो. म्हणजे कोमल रे हा शुद्ध रे या स्वराच्या लागुन खाली पण सा आणि शुद्ध रे यांच्या मध्ये हा असा स्वर आहे जो शुद्ध रे पेक्षा कमी उंचीचा पण सा पेक्षा जास्त उंचीचा स्वर आहे. म्हणून याला आपण कोमल रे म्हणतो. तर आपणास कोमल स्वराची संकल्पना समजली. असे एकुण ४ कोमल स्वर आहेत ते म्हणजे रे ग ध आणि नी. आता आपण तिव्र स्वराच्या संकल्पनेची चर्चा करू. तिव्र स्वर म्हणजे शुद्ध स्वराच्या उंची पेक्षा जास्त उंचीचा स्वर. असा तिव्र स्वर एकच आहे. तो म्हणजे मध्यम अर्थात म. शुद्ध मध्यमापेक्षा उंच असणारा व शुद्ध मध्यम व पंचम या मध्ये असणारा स्वर म्हणजे तिव्र मध्यम. अशा प्रकारे आपणास शुद्ध, कोमल व तिव्र अशा अनुक्रमे ७,४ आणि १ अशा एकुण १२ स्वरांची ओळख झाली.

ज्यावेळी आपण या स्वरांना कागदावर लिहीतो त्यावेळी शुद्ध, कोमल आणि तिव्र स्वरांचा उल्लेख कसा करायचा याची संकल्पना समजून घेऊ. शुद्ध स्वर हे शुद्ध स्वरूपातच लिहीले जातात. जसे सा रे ग म प ध नी. कोमल स्वर लिहीताना त्या स्वरांच्या खाली आडवी

रेष दिल्याने त्याची ओळख होते. जसे रे ग ध नी तर तिव्र स्वराच्या वर उभी रेष दिल्याने त्याची ओळख होते. जसे मे. आता हे शुद्ध, कोमल आणि तिव्र स्वर अनुक्रमे खालील प्रमाणे येतात.

सा रे रे ग ग म मे प ध ध नी नी

या सामान्य वाटणाऱ्या सात स्वरांची सुक्ष संकल्पना म्हणजे शुद्ध, कोमल व तिव्र या १२ स्वरांची संकल्पना आहे. यातील अतिसुक्ष्म संकल्पना म्हणजे श्रुती संकल्पना आहे. ही श्रुती संकल्पना आपण समजून घेऊ.

असा छोट्यात छोटा नाद जो कानास स्पष्ट एकु येईल अशा नादास श्रुती असे म्हणतात. अशा एकुण २२ श्रुती आहेत ज्या सात स्वरांमध्ये विभाजीत केलेल्या आहेत. प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथकारांनी तसेच अधुनिक काळातील ग्रंथकारांनी एकुण २२ श्रुतींचे विभाजन मान्य केलेले दिसून येते. परंतू त्याच्या विभागणी करण्यामध्ये थोडासा फरक जाणवतो. प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथकारांनी सात स्वरांच्या विभाजनात शेवटची श्रुती ही स्वरांवर दर्शवली असून अधुनिक ग्रंथकारांनी सात स्वरांच्या विभाजनात पहिली श्रुती दर्शवली आहे. २२ श्रुतींची नावे व श्रुती दर्शवण्याची पद्धती ही आपणास पुढील तक्त्यावरून समजून येईल.

| श्रुतींची संख्या | श्रुतींची नावे | प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथकारांचे विभाजन | अधुनिक ग्रंथकारांचे विभाजन |
|---|---|---|---|
| १ | तीव्रा | | षड्ज |
| २ | कुमुव्दती | | |
| ३ | मंदा | | |
| ४ | छंदोवती | षड्ज | |
| ५ | दयावती | | रिषभ |
| ६ | रंजनी | | |
| ७ | रतिका | रिषभ | |
| ८ | रौद्री | | गंधार |
| ९ | क्रोधा | गंधार | |
| १० | वज्रिका | | मध्यम |
| ११ | प्रसारिणी | | |
| १२ | प्रीति | | |
| १३ | मार्जनी | मध्यम | |
| १४ | क्षिति | | पंचम |
| १५ | रक्ता | | |
| १६ | संदीपिनी | | |
| १७ | आलापिनी | पंचम | |
| १८ | मदन्ती | | धैवत |
| १९ | रोहिणी | | |
| २० | रम्या | धैवत | |
| २१ | उगा | | निषाध |
| २२ | क्षोभिणी | निषाध | |

आता आपणास श्रुतिंवर शुद्ध स्वरांची स्थापना आपणास समजली पण आता मनात एक प्रश्न निर्माण झाला असेल की विकृत स्वरांची स्थापना कुठे केलेली असेल हे आपणास कसे समजेल. तर आपण कोमल आणि तिव्र स्वरांची श्रुतींवरची स्थापनेची संकल्पना लक्षात करून घेऊ. वरील तक्ता आपणास समजला असेल तर पुढील तक्त्यावरुन आपणास विकृत स्वरांची श्रुतिंवरील स्थाने लक्षात येतील.

| श्रुतींची संख्या | श्रुतींची नावे | सर्व शुद्ध, कोमल व तिव्र अशा १२ स्वरांची स्थापना |
|---|---|---|
| १ | तीव्रा | षड्ज |
| २ | कुमुव्दती | |
| ३ | मंदा | कोमल रिषभ |
| ४ | छंदोवती | |
| ५ | दयावती | रिषभ |
| ६ | रंजनी | |
| ७ | रतिका | कोमल गंधार |
| ८ | रौद्री | गंधार |
| ९ | क्रोधा | |
| १० | वज्रिका | मध्यम |
| ११ | प्रसारिणी | तिव्र मध्यम |
| १२ | प्रीति | |
| १३ | मार्जनी | |
| १४ | क्षिति | पंचम |
| १५ | रक्ता | कोमल धैवत |
| १६ | संदीपिनी | |
| १७ | आलापिनी | |
| १८ | मदन्ती | धैवत |
| १९ | रोहिणी | |
| २० | रम्या | कोमल निषाध |
| २१ | उगा | निषाध |
| २२ | क्षोभिणी | |

उपरोक्त तक्त्यावरून आपणास असे समजते २२ श्रुती ह्या सर्व समान अंतरावर आहेत. पण स्वरांमधील अंतर हे भीन्न आहे. स्वरांतील भीन्न अंतर हेच त्या स्वराची स्पष्ट ओळख आहे. स्वर आणि श्रुती यांचे स्पष्ट विवेचन हे आपणास या दोन तक्त्यांवरून सुस्पष्ट समजते. सात स्वरांची परिभाषा ही सर्वसामान्य लोकांना समजते. १२ स्वरांची परिभाषा ही संगीताचे प्राथमीक शिक्षण घेतलेल्या लोकांना समजते. पण श्रुतींची परिभाषा समजण्यासाठी निष्चीतच त्या व्यक्तीला रियाजात पारंगत असायलाच हवे. त्याविना श्रुतींची समज होणे असंभव आहे.

**संदर्भ :**


१. संगीत विशारद - वसंत , लक्ष्मीनारायण गर्ग, हाथरस.
२. क्रमिक पुस्तक मालिका- पं. विष्णु नारायण भातखंडे.
३. संगीत शास्त्र विज्ञान- डॉ. पन्नालाल मदन,डॉ. मीरा मदन.